2581-4575
International Journal For Recent Developments in Science & Technology
Crossref
A Peer Reviewed Research Journal

वाढत्या कृषी उत्पादन खर्चामुळे शेतकरी हैराण

Krishna Shankar Shahane,
Asst. Prof. in Economics,
Gokhale Education Society's B.Y.K. College of Commerce,
College Road, Nashik, Maharashtra, India.
Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune.

अत्याधुनिक काळात सर्वच क्षेत्रामध्ये नवनवीन सुधारणा होत असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर होणारे नवीन बदल हे उत्पादन वृद्धीसाठी फायदेशीर तर असतातच पण ते खर्चिक देखील असतात. शेती क्षेत्रातही हे बदल अंगीकारले जात आहे हे फायदेशीर आहे. पण शेतीतून उत्पादित होणाऱ्या मालाचा उत्पादन खर्च त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाढतो.

शेतीतून विविध प्रकारची पिके घेत असतांना शेतकऱ्याला अनेक घटकांवर मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. या वस्तू व सेवा भाडोत्री किंवा विकत घेतल्यानंतर त्यावर खर्च करावा लागतो. तसेच घरातील वस्तू, श्रम वापरले तर त्याचा समावेश बरेचदा शेतकरी उत्पादन खर्चात करत नाही या सर्व बाबींचा समावेश उत्पादन खर्चात केला तर कृषी मालाचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणावर होतो, असे लक्षात येते. त्यामानाने शेतमालाला मिळणारी बाजारातील किंमत अत्यंत कमी येते.

शेती व्यवसायातील नानाविध समस्या ओळखण्यासाठी तपशीलवार खर्च विश्लेषण करणे आवश्यक असते. शेतीवर स्थिर आणि बदलता खर्च केला जातो. एकूण खर्चात स्थिर आणि बदलत्या खर्चाचा समावेश होतो.

स्थिर खर्च म्हणजे निश्चित मालमत्तेवर, घटकांवर केलेला खर्च, जो उत्पादन खर्च म्हणून ओळखला जातो. हा खर्च उत्पादनाच्या प्रमाणात बदलत नाही. स्थिर खर्चाला निश्चितपणे केला जाणारा खर्च असेही म्हणतात. शेतीतील स्थिर खर्च म्हणजे, पीक घेतले अथवा नाही तरीही केला जाणारा खर्च होय. यात प्रामुख्याने यंत्रसामग्री, इमारती, जमीन यासारख्या घटकांवरील खर्च समाविष्ट केला जातो. स्थिर खर्च हे उत्पादनानुसार किंवा विक्री केलेल्या वस्तूच्या किंवा सेवांच्या प्रमाणात झालेली वाढ किंवा घट यानुसार बदलत नाहीत.

शेतीत बदलत्या साधनांवर केल्या जाणाऱ्या खर्चाला बदलता खर्च असे म्हणतात. कृषी उत्पादन वाढत असताना हा खर्चही वाढतो. यात कच्च्या मालावरील खर्च, इंधनावरील, श्रमिकांच्या वेतनावरील याप्रकारचे खर्च केले जातात. की, जे वाढत्या उत्पादनानुसार वाढत जातात.

शेती मशागतीत विविध टप्प्यांवर विविध प्रकारचा खर्च शेतकऱ्याला करावा लागतो. जमिनीची नांगरणी, पेरणी, सपाटीकरण, बांधाची काळजी, वखरणी, खुरपणी व निंदणी, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, मानवी श्रम, बियाणे, खते, कीटकनाशके, विविध अवजारे उदा. खुरपी, विळा, पाटी, नांगर, ट्रॅक्टर, बैलगाडी, टिकाव, पावडे, फवारणी यंत्र, पेरणीसाठी पाभर, कापणी - मळणी यंत्र विहिरीतून पाणी काढण्यासाठी मोटारीचा खर्च, ऑईल इंजिन असेल तर त्यावरील खर्च, बैलांच्या श्रमाची किंमत, पिकाचे संरक्षण किंवा राखण करण्यावरील खर्च, बुजगावणे, अती ऊन किंवा अती पावसापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी केलेल्या अच्छादनावरील खर्च, पिकांची कापणी केल्यावर त्याची मळणी करण्यांवरील खर्च, त्याची प्रतवारी करणे, कॅरेट वापरल्यास त्याचा खर्च, पोते इ वरील खर्च त्याची शेतकऱ्याने साठवणूक केली तर त्या साठवण गृहाचा खर्च, काही शेतमालासाठी प्रकारे पॅकिंग केली

International Journal For Recent Developments in Science & Technology
2581-4575
Crossref
A Peer Reviewed Research Journal

जाते. त्यावरील खर्च, बाजारभावाची चौकशी करण्यासाठी टेलिफोन, मोबाईल, मासिके, इंटरनेट यांचा वापर केला तर त्यावरील खर्च, प्रत्यक्षात शेतमालाची बाजारपेठपर्यंत बाहतूक करणे, त्याचे भाडे, वाहनाचा टोल, बाजारपेठेतील हमाली, तोलाई. मापाई, विविध आकार प्रकार तसेच साठवणूक व बाजारपेठेपर्यंत मालाची वाहतूक, स्वतःची जमीन असेल तर तिचा आकार किंवा ती जमीन जर भाडोत्री वापरली असती तर जो आकार किंवा भाडे द्यावे लागले असते ते भाडे उत्पादन खर्चात धरावे, स्वतःचे वाहन वापरून केली जाणारी वाहतूक, इंधनावरील खर्च, मोबाईल, व्हॉटस अप, इंटरनेट, इ. घरातील अनेक व्यक्ती स्वतःच्या शेतीवर काम करतात त्यांची मजुरी, घरातील अनेक लहान मुलांकडून शेतीची अनेक कामे आपण करून घेतो. उदा. पिकांचे रक्षण किंवा राखणदारी इ. शेतीतील अनेक कामे उदा. मशागत, पेरणी, निंदणी, कापणी, मळणी, मालाचे कमी होणारे वजन व होणारे नुकसान, त्यामुळे मालाचा घसरणारा दर्जा, चांगली किमत मिळण्यासाठी शेतकऱ्याने विविध बाजारपेठेचा केलेला अभ्यास किंवा संशोधन त्यासाठी आलेला खर्च, शेतीमध्ये मदत करणाऱ्या बैलजोडीच्या खाण्या पिण्यावरील तसेच त्यांच्या सुदृढतेसाठी केलेला खर्च, त्यांच्या राहण्याच्या जागेसाठी केलेला खर्च या सर्व टप्प्यांवर विविध यंत्रांचा केलेला वापर त्याचे भाडे किंवा त्यावरील खर्च अनेकदा उत्पादन खर्चाचा विचार करताना शेतकरी प्रत्यक्षात ज्या वस्तू विकत घेतात किंवा भाडोत्री घेतात अशा त्या त्या हंगामात घेतलेल्या वस्तू व सेवांचा आकार उत्पादन खर्चात धरतात. पण अनेकदा पूर्वी घेऊन ठेवलेल्या वस्तू किंवा यंत्रे, घरातील श्रमिक यांचा आकार उत्पादन खर्चात धरतांना प्रतवारी, पॅकिंग, स्वतःच्या वाहनाचा वापर करून वाहतूक, घरातील कॅरेट, गोण्या, पोते यावरील खर्चाचा समावेश उत्पादन खर्चात करावा लागतो.

शेती मशागत करताना घरातील किंवा स्वतःच्या अनेक वस्तू वापरल्यास त्याचा मोबदला उत्पादन खर्चात समाविष्ट करताना अनेक अडचणी येतात. उदा. कोणत्या दराने हे आकार धरावेत. तसेच घरच्या सदस्यांनी शेतीमध्ये केलेले श्रम. इ. यातील सर्वच प्रकारचे खर्च उत्पादन खर्चामध्ये काटेकोरपणे धरले तर उत्पादन खर्चात मोठी वाढ झाल्याचे दिसून येईल. त्यामानाने शेतीत उत्पादित झालेल्या मालाला मिळणारी बाजार किंमत किती कमी आहे हे लक्षात येते.

थोडक्यात, शेती करत असतांना अनेक कामे अशी असतात की, त्यांचा समावेश पिकाच्या एकूण उत्पादन खर्चात करणे आवश्यक असते परंतु हा खर्च एकूण उत्पादन खर्चात धरला जात नाही. हा खर्च काटेकोरपणे मोजून एकूण उत्पादन खर्चात धरल्यास पिकांवरील हा उत्पादन खर्च खूपच मोठ्या प्रमाणावर येतो असे लक्षात येते. त्या मानाने शेतकऱ्यांच्या पिकांना किफायतशीर बाजारभाव प्राप्त होत नाही ही मोठी शोकांतिका आहे.

References

1. **Desai, G. M. & Namboodiri, N. V.** (2001). *Fertilizer Use in Indian Agriculture: An Assessment of Data, Trends and Outlook for 2020*. ICRISAT.
2. **Chand, Ramesh.** (2009). *Development Policies and Agricultural Markets*. Academic Foundation.
3. **Bhalla, G. S. & Singh, Gurmail.** (2010). *Economic Liberalisation and Indian Agriculture: A District-Level Study*. SAGE Publications.
4. **Datt, R. & Sundharam, K. P. M.** (2010). *Indian Economy*. S. Chand Publishing.

5. **Chand, R. et al.** (2010). "Farm Size and Productivity: Understanding the Strengths of Smallholders and Improving Their Livelihoods." *Economic and Political Weekly*, 46(26-27), 5–11.